
# हे वाचलं का?

रसिक वाचक मित्रहो !
सातत्याने बाजारात इतकी नवी पुस्तके येत असतात, की पुस्तक पेठेत आल्यावर नेमके कोणते पुस्तक घ्यावे तेच उमजत नाही. म्हणूनच आम्ही अधून मधून काही खास नव्या पुस्तकांची शिफारस करून माहिती देत असतो – 'हे वाचलं का?' या सदरात. तर याच सदरात आज नव्याने आलेल्या **दहा उत्तम पुस्तकांची माहिती देत आहोत.**
जरूर खरेदी करून वाचा ही पुस्तके !





## 1.बिन्दुनादकलातीत

**लेखक: महेश एलकुंचवार**

**किंमत: 200/- विशेष सवलत: 160/-**

बिन्दुनादकलातीत हा महेश एलकुंचवार यांचा मौनराग आणि त्रिबंध या दोन ललित लेखसंग्रहांनंतरचा तिसरा ललितलेख संग्रह. या दोन्हींशी नातं सांगतानाच त्यापुढच्या अपार शक्यता धुंडाळणारा. बिन्दुनादकलातीत हे सर्जकाने सैतानाच्या अनुषंगाने, मानववंशाशी साधलेले नव- रचित, महाकथन आहे, जिथे अनेक भ्रमांबद्दल बोलताना प्रकाश टाकला जातो तो निसर्गतत्त्वाच्या सायुज्याने गवसलेल्या परमसत्यावर! बहुमितीय अवकाशात घडलेला कलावंताचा व्योमातीताकडचा प्रवास यात सूचित केला आहे, ज्यात काल-चौकट वितळून जाते. लौकिक दृष्ट्या विविध कालखंडांत जगलेली अवतीभवतीची माणसं, संत, तत्त्वज्ञ, प्रज्ञावंत-कलावंत यांना कालबंधन नसलेल्या अतिभौतिकीय अवकाशात प्रस्थापित करून, त्यांच्यातील संवादाचा साक्षात प्रत्यय देणाऱ्या किमयागाराचा हा अलौकिक खेळ आहे. सृष्टीतील निरागसतेला उद्गार देणाऱ्या गवाक्षातून, वैश्विक संस्कृतीच्या महाद्वारापर्यंत नेणारी, चिरंतन वास्तवाच्या शोधात घडणारी कलासिद्धिच्या मार्गावरची ही जादुई यात्रा आहे. ज्यात विश्ववात्सल्याबरोबरच, निरोपाच्या कड्यावर वत्सल प्रकाशात उमलत असलेल्या शहाण्या विसर्जनाची वाट गवसते. मौनराग, त्रिबंध, बिन्दुनादकलातीत हो लौकिक अलौकिक-पारलौकिक यांना गवसणी घालणारी त्रयी आहे. - **संजय आर्वीकर**




## 2.जी. ए. : द लॉस्ट पॅराडाईज

**लेखक: महेश शेट्ये**

**किंमत: 525/- विशेष सवलत: 425 /-**

जी. ए. कुलकर्णी हे चोखंदळ रसिक वाचकांवर मंत्रमोहिनी टाकणारे नाव आहे, त्याचबरोबर अनेक वाचकांसाठी त्यांचे लेखन म्हणजे एक अनाकलनीय ठिकाणाकडे नेणारी दुर्बोध, दुर्घट वाट आहे. श्री. महेश शेट्ये या जी. ए. प्रेमी वाचकाला ही स्थिती बदलावी असे वाटले. जी. एं. ची पत्रे, त्यांच्याविषयी वृत्तपत्रांत व नियतकालिकांत छापून आलेले लेख, आप्तमित्रांनी सांगितलेल्या आठवणी, परीक्षणे अशा नानाविध संदर्भाच्या मंथनातून लेखकाने हे नवनीत वाचकांच्या हाती ठेवले आहे. जी. ए. च्या कथा आतवर पोहोचल्या की त्या आपल्या अनुभवविश्वाला समृद्धतेचा एक नवीन आयाम दिल्याशिवाय राहत नाहीत. पण त्या समजण्यासाठी जाणिवांना संवेदनक्षम पदर आणि बहुवाचनतेने विकसित झालेली उमज आवश्यक आहे; आणि हा प्रवास प्रत्येकाने आपापला करायचा आहे. अशा प्रवासाला नव्यानेच निघालेल्या किंवा जुन्याच परंतु गोंधळलेल्या वाचकांसाठी हे उत्कृष्ट पुस्तक आहे. रुढार्थाने हे जी. ए. यांचे चरित्र नाही. त्यांचा जीवनप्रवास, त्यांचे आप्तजनांशी असणारे भावानुबंध, विविध टप्प्यांवरील जगणे, मराठी आणि इंग्रजी साहित्याचा विविधांगी सखोल अभ्यास आणि त्यायोगे एक सकस साहित्यिक म्हणून झालेला त्यांचा विकास, विविध विषयांवर त्यांचे चिंतन या सगळ्याचे नव्याने संकलन आणि संपादन करून एकाच खंडात समाविष्ट केलेले हे समग्र चरित्रात्मक पुस्तक आहे. बेल्जियम काचांच्या विविधरंगी आणि भिन्न आकारांच्या तुकड्यांनी बनलेल्या कलाकृतीप्रमाणे हा ए मनोहर आकृतिबंध आहे, हे जी. एं. च्याच पुस्तकांच्या नावांनी सजलेल्या अनुक्रमणिकेवरून लक्षात येईल. एखाद्या पर्वतशिखरावर असलेल्या गूढ तरीही आकर्षक मंदिराने सर्वांचे चित्त वेधून घ्यावे, परंतु निबीड अरण्यातून वरपर्यंत जाणारी वाट दिसत नसल्याने वाटसरूने नाउमेद होताच त्याच्या नजरेस पायऱ्या पडाव्यात तसे हे पुस्तक जिज्ञासू वाचकांच्या हाती पडत आहे.

- **जयश्री जंगले**





## 3.रेघ

**लेखक: अवधूत डोंगरे**

**किंमत: 850/- विशेष सवलत: 680/-**

गडचिरोलीत पाचेक हजार आदिवासींनी वनहक्कांसंदर्भात मोर्चा काढत्या, त्याची छोटीशीही वातमी मुख्यप्रवाही माध्यमांमधून का आली नसेल ? अमुकएक बिस्कीट खाण्यापेक्षा आमच्या कंपनीचं हे बिस्कीट खाणं ही 'इंटरनॅशनल निवड असल्याचं एका जाहिरातीत का सांगण्यात आलं? 'डंगर', म्हणजे खंजीर किंवा कट्यार, अशा नावाची बाइक 'रस्ते चिरत जा' असे जाहिरातीतून का सांगते ? एखादा नेता एकमेवाद्वितीय आहे, असं ठसवण्यासाठी माध्यमं नि चिन्हें कशी वापरत्य जातात ? एखाद्या नेत्याची किंवा विचारसरणीची मर्यादा सांगताना माध्यमं नि चिन्हें यांचा वापर कसा होतो ? एखाद्या कवीने 'वर्ल्ड फेमस' होण्यासंबंधी इंग्रजीचा उल्लेख करणं आणि कम्प्युटर हार्डवेअरचा कोर्स केलेल्या तरुणाने उपजीविकेच्या निकडीतून इंग्रजीचा उल्लेख करणं, यात काही सांगड घालणं शक्य

आहे का? 'लेखकाचं क्षेत्र' म्हणजे काय? त्यात लेखकव्यक्तीत्य कितपत खटपट करता येते? समाज, बाजार, यांच्याशी लेखकव्यक्तीच्या वाटाघाटी कशा असतात ? एकामागून एक कोणत्या ना कोणत्या स्क्रीनवरची दृश्यं सरकावत राहणं, एकामागून एक दृश्यं स्वीकारत राहणं, हे काय आहे? 'दिसतं तसं नसतं, म्हणूनच जग फसतं', ही सोपी म्हण आहे; पण खरं तर सगळे दिसत असूनही जग स्वतःला फसवून घेत नाही का ? या प्रश्नांमधल्या घटना नि तपशील वेगवेगळे असतील, तरी हे प्रश्न परस्परांहून तुटलेले नाहीत. उलट, असे प्रश्न अनेक सूक्ष्म धाग्यांनी परस्परांशी जोडलेले असतात. या धाग्यांच्या जमतील तशा नोंदी ठेवायचा प्रयत्न 'रेघ' या ब्लॉगवर गेल्यो सुमारे तेरा-चौदा वर्ष अनियमितपणे सुरू आहे. यातल्या निवडक नोंदींचा वापर करून काहीएक सलग आकृती साकारण्याचा प्रयत्न सदर खंडामध्ये केल्या आहे.





## 4.पाने आणि पानगळ

**लेखक: वसंत वसंत लिमये**

**किंमत: 240/- विशेष सवलत: 180/-**

वसंत वसंत लिमये हे एक झाड आहे. हिरवंगार डवरलेलं झाड, ज्यावर हिरव्या पानांची जत्रा फांद्या फांद्यांवर बहरात आलेली दिसते. शेकडो पक्ष्यांनी या झाडावर घरटी बांधलेली आहेत. माणसाचं झाड केव्हा होतं? जेव्हा सर्व ऋतूत त्यावर पाना फुलाचा बहर कहर करत असतो. माणसाचं आयुष्य समृद्ध असतं म्हणजे नक्की काय, तर त्याने आयुष्याच्या वाटेवर जमवलेली अगणित माणसं. वसंत वसंत लिमये हे एक सदैव भटकंतीला निघालेलं झाड असून आजवरच्या सगळ्या भटकंतीमधून त्यांनी जी माणसांच्या पानांची हिरवळ जमवलीय ती किती समृद्ध आहे हे त्यांचं 'पाने आणि पानगळ' वाचून कळतं. देशीविदेशी, गावोगावी त्यांनी मैत्रीच्या हिरव्या रंगांची मैत्ररूपी पानं रुजवत ते स्वतःच एक समृद्ध झाड होऊन गेलेले आहेत. किंबहुना त्यांनी जमवलेली पानं फक्त पानं नसून स्वतःच एक झाड आहेत किंवा होतील. वर्षानुवर्ष डोंगरदऱ्या, रानोमाळ भटकत त्यांनी स्वतःतला एक कलावंत माणूस म्हणून ताजवा हिरवा ठेवलेला आहे. या पुस्तकात आलेल्या प्रत्येक व्यक्तीबद्दलची आपुलकी, प्रेम आणि मैत्री त्यांनी काही पानांतच अतिशय नेमकी मांडली आहे. त्यांच्या आयुष्यात आलेली हिरवी पानं वाचता वाचता आपल्याही आयुष्यात रुजतात, बहरतात. माणसं जमवण्याच्या, मैत्री रुजवण्याच्या, जगणं सजवण्याच्या या समृद्ध खेळाचं हिरवं रान करणाऱ्या वसंत वसंत लिमये यांचं 'पाने आणि पानगळ' साठी खूप खूप अभिनंदन !

**- कवी सौमित्र (किशोर कदम)**




## 5.कथा जैवविविधतेची (प्रवास जीवसृष्टीचा...)

**लेखक: डॉ.संजय जोशी**

**किंमत: 500/- विशेष सवलत: 375/-**

'कथा जैवविविधतेची' म्हणजेच 'अ स्टोरी ऑफ बायोडायव्हर्सिटी' या पुस्तकाच्या माध्यमातून डॉ. संजय जोशी या नामवंत शिक्षक, निसर्ग अभ्यासकांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेल्या, पृथ्वीवरील जैविक विविधतेच्या उत्पत्तीपासून आजवरच्या वाटचालीचे एक अद्वितीय आणि अद्भुत दर्शन आपल्याला घडते. जीवनातील मूलतत्त्व आणि सजीवांच्या उत्क्रांतीची प्रक्रिया विषद करताना डॉ. जोशी पृथ्वीवरील जीवसृष्टीची विस्तृत विविधता, तिच्यातील असंख्य प्रजातींचे परस्परावलंबित्व, तिचे सौंदर्य व जागतिक महत्त्व यांचे अप्रतिम चित्रण करतातच, पण त्याचबरोबर जैवविविधतेला चालना देणाऱ्या यंत्रणांवर प्रकाश टाकताना मानवी हस्तक्षेपांमुळे जैवविविधतेच्या अस्तित्त्वावरील संकटाचे सखोल व व्यापक विश्लेषणही सादर करतात. जैवविविधतेच्या संरक्षणाबाबत पूर्वापार असलेली जागरूकता व तिच्या संवर्धनासाठी होणाऱ्या वैयक्तिक, तसेच आंतरराष्ट्रीय प्रयत्नांचा मागोवाही हे ग्रंथमय पुस्तक ओघवत्या शैलीत घेते. जीवसृष्टीच्या विविधतेवर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांमध्ये 'कथा जैवविविधतेची' हा एक मैलाचा दगड ठरेल आणि जागतिक जैवविविधता संवर्धन व विकासाच्या प्रयत्नांमध्ये दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करणारा असेल, याची खात्री वाटते !




## 6.कबीर:संत ,सुधारक आणि कवी

**लेखक: इंद्रजीत भालेराव**

**किंमत: 430/- विशेष सवलत: 330/-**

कबीरांची कविता सहाशे वर्षांपूर्वी लिहिली गेलेली असली तरी आजही ती तुमच्या माझ्याशी संवाद करते. कबीर आपल्या समकाळाला उपदेश करत होते, पण तो आजही तुमच्या माझ्यासाठी तितकाच महत्त्वाचा आहे. कबीरांच्या कवितेत मनाचा गोडवा आहे. तसेच खऱ्या मनाचे प्रखर बोलही आहेत. कबीरांची कविता आजही आपणाला आश्वस्त करते आणि अस्वस्थही करते. फक्त खुल्या मनानं आपण तिला सामोरं जाण्याची गरज आहे. कबीरांच्या कवितेला सतत सहाशे वर्षे उत्कट प्रतिसाद मिळालेला आहे. कबीरांवर प्रेम करणाऱ्यांमध्ये सर्व जातीधर्मांचे लोक आहेत. त्यात जसे राजेरजवाडे आहेत तसे बनभिकारही आहेत, प्रकांड पंडित आहेत तसेच निरक्षर मजूरही आहेत, नानक, दादूसारखे धर्मसंस्थापक आहेत तसेच निधर्मीही आहेत, माणूस कालचा असो की आजचा कबीर त्याच्या मनात खोलवर जागा मिळवतात. कबीरांवर मनातून प्रेम करणारी माणसं नेहमीच आपली जातीय ओळख विसरून स्वतःला निरपेक्ष ठेवतात. ते जशी आपली जात लपवत नाहीत तसेच ते आपली जात मिरवतही नाहीत. कबीर ज्या निर्गुणी धारेचे प्रमुख संत होते, तिचं वैशिष्ट्यच हे होतं की, ती प्रखर विरोधक असली तरी ती कुठल्या जातीधर्मांची विरोधक नव्हती तर जी व्यवस्था तलवारीऐवजी म्यानाला महत्त्व देत होती, त्या व्यवस्थेला या निर्गुणींचा प्रखर विरोध होता. तुमच्या जन्मजात ओळखीपेक्षा तुमच्या कर्तृत्वाच्या स्वतंत्र ओळखीला कबीरांच्या कवितेची मान्यता आहे. त्यामुळेच इथल्या सर्व मागास समूहांनी कबीरांना आपलं मानलं तितकंच पुढारलेल्या निरपेक्ष लोकांनीही कबीरांना आपलं मानलं.





## 7.शह आणि काटशह

**लेखक: डॉ.राजीव जोशी**

**किंमत: 400/- विशेष सवलत: 300/-**

रुग्णावर उपचार करताना आलेल्या निरनिराळ्या अनुभवांतून मिळाला एक अमिट धडा : डॉक्टर आणि पेशंट यांच्या नात्यात विसंवाद निर्माण होण्यास कारणीभूत ठरते वैद्यकीय व्यवसायातील चुरस ! १९८७ साली घडलेली एक सत्यकथा ! वैद्यकीय प्रवेशांमधे होणाऱ्या गोंधळांची ! त्याविरुद्ध आवाज उठवणाऱ्या लढ्याची ! प्रशासन, विद्यार्थी-पालक अन् वृत्तपत्रे यांनी एकमेकांवर आणि न्याययंत्रणेवर टाकलेल्या डावपेचांची ! या लढ्यात प्रत्यक्ष सहभागी झालेल्या तज्ज्ञाने घेतलेला वृत्तांतवेध




## 8.राक्षस आणि पोपटाची ॲडल्ट कथा

**लेखक: श्रीकांत बोजेवार**

**किंमत: 195/- विशेष सवलत: 140/-**

संशयी वृत्तीचा बळवंत पत्नी सुलोचनाकडून वाट्टेल तेव्हा, हवं तसं सुख ओरबाडून घेतो. पण एरवी तिला कवडीचंही मोल देत नाही. पण एकदा सुलोचना अशी काही शक्कल लढवते की, बाजी पूर्णतः पलटून जाते... राहुल आणि आपल्या त्या 'एकांतगोष्टी' पाहायला तो कावळा रोज खिडकीजवळच्या फांदीवर बसत नसेल ना? या प्रश्नाने सानिकाचं मन पोखरतं. तिची आई तिला काळा गूळ वापरून एक उपाय करायला सांगते. त्या उपायाने तिच्या मनातली अस्वस्थता क्षमते का ? त्या कावळ्याचं रहस्य असतं तरी काय?... एकदा लेखकाला कथेचं बीज सुचतं. पण पुढच्या क्षणी ते निसटून जातं. तो त्या बीजाचा शोध घेण्यासाठी जिवाचा आटापिटा करतो. मेंदू-तज्ज्ञाला भेटून मेंदूचा कोपरान् कोपरा शोधतो. शेवटी ते बीज सापडेल असं वाटतं, पण... साध्या घटना-प्रसंगांमधून आणि नेमक्या, खुसखुशीत संवादांमधून मिश्किल, उपहास आणि ब्लॅक कॉमेडी यांचा चपखल वापर करत अंतर्मुख करणाऱ्या ९ कथांचा गुच्छ...





## 9.पावणे दोन पायांचा माणूस

**लेखक: श्रीकांत बोजेवार**

**किंमत: 240/- विशेष सवलत: 170/-**

गरीब घरचा आणि जन्मतः एक पाय तोकडा असलेला 'लंगड्या' बुद्धीने मात्र व्यवहार-चतुर आणि धूर्त आहे. या हुशारीच्या साहाय्याने त्याने त्याच्या व्यंगावर मात केली आहे. अभ्यासात अजिबात न चालणारं त्याचं डोकं व्यवहारात मात्र तेजीत चालतं. यातूनच त्याची यशस्वी होण्याची आणि लोकांना तालावर नाचवण्याची महत्त्वाकांक्षा वाढत जाते आणि ती पूर्ण करण्यासाठी त्याला मदत करत असतं एक मांजर ! हे मांजर लोकांच्या घरी गुपचूप घुसून त्यांच्या 'खासगी' बातम्या त्याला पुरवतं... आणि त्या जोरावर गावपातळीवरून सुरू झालेला लंगड्याचा प्रवास आमदार तयार करणारा 'किंगमेकर' इथपर्यंत पोहोचतो... पण मग अशा काही घटना घडतात की त्याच्या आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळते... शेवटी, लंगड्याची ही कथा अनेक प्रश्न निर्माण करते... लंगड्या भौतिक यशोशिखराला पोहोचतो की नैतिक अधःपतनाला ? माणसाच्या चकचकीत यशाखाली काय काय दडवलं गेलेलं असतं? महत्त्वाकांक्षेपायी माणूस कोणत्या थराला जाऊ शकतो? नैतिक आणि अनैतिक यांच्या सीमारेषा कुठे संपतात, कुठे सुरू होतात ? मानवी जगण्याच्या अतर्क्यतेवर ब्लॅक कॉमेडीच्या माध्यमातून भाष्य करणारी, बौद्धिक रंजन करत खिळवून ठेवणारी विलक्षण कादंबरी... पावणेदोन पायांचा माणूस !




## 10.प्रतिभासूर्य रवींद्रनाथ टागोर

**लेखक: विलास खोले / प्रदीप कुलकर्णी**

**किंमत: 450/- विशेष सवलत: 340/-**

रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्याची मोहिनी जगभरच्या वाचकांवर अद्यापही आहे. ती कधीही उतरणार नाही. मराठीत त्यांच्याबद्दलची चरित्रात्मक तसेच त्यांच्या विचारांची व साहित्याची चर्चा असणारी पुस्तके सध्या दुर्मीळ झाली आहेत. डॉ. विलास खोले आणि प्रदीप कुलकर्णी यांनी लिहिलेले 'प्रतिभासूर्य रवींद्रनाथ टागोर' हे पुस्तक रवींद्रनाथांच्या जीवनाच्या, साहित्याच्या आणि कार्याच्या अभ्यासकांना आणि रसिकांना नक्कीच आवडेल व उपयोगी ठरेल. इंग्रजी आणि मराठी संदर्भसाहित्यावरून लेखकद्वयांनी परिश्रमपूर्वक हे पुस्तक लिहिलेले आहे. पुस्तकाच्या अखेरीस रवींद्रनाथांच्या समग्र बंगाली साहित्याची सूचीही दिलेली आहे. जिज्ञासूंना त्या सूचीचा उपयोग होईल. हे पुस्तक जितके वाचनीय आहे तितकेच ते उपयुक्तही आहे.

**- विलास गिते**